CMYK

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

रविवार
२६.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २९०
किंमत : ३ रू. पाने : ४

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 

प्रजासत्ताक दिनाच्या सर्व वाचकांना शुभेच्छा..!

# मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या

## शिंदे समितीला मुदतवाढ,मनोज जरांगेंचे उपोषण सुरू,सरकारकडे १० मागण्या

जालना, (प्रतिनिधी) :- मराठा आरक्षणाच्या मागणीकरिता मनोज जरांगे पाटील यांच्याकडून पुन्हा एकदा आमरण उपोषणाला सुरूवात झाली असून शनिवारी पहिल्याच दिवशी उपोषणस्थळी आंतरवाली सराटीमध्ये मोठी गर्दी झाली होती. मराठा समाजाच्या १० मागण्या आम्ही सरकारपुढे ठेवलेल्या आहेत. सरकारने अध्यादेश काढून त्वरीत त्याची अंमलबजवाणी करून मराठा समाजाचे दु:ख हलके करावे, असे जरांगे म्हणाले. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्याही बळी प्रकरणात आपल्याला न्याय देण्याच्या भूमिकेसाठी सरकारविरोधात लढायचे असल्याचे जरांगे यांनी सांगितले. ▶▶पान २ वर



### राज्य सरकारकडे १० मागण्या

आरक्षणाच्या मागणीकरता २५ जानेवारीपासून उपोषण सुरू झाले आहे. सगेसोयरे कायदा अंमलबजावणीसाठी जवळपास एक वर्ष लागलं. एक वर्षापासून समाज रस्त्यावर आहे. आजही मराठे त्याच ताकदीने उभे आहेत. आमच्या त्रासाची जाण सरकारला नाही. सरसकट कुणबी प्रमाण द्या. सगे सोयरे कायद्याची अंमलबजावणी तातडीने लागू करा. कुणबी नोंदीच्या आधारावर त्यांना आरक्षण द्यावे, सगळ्या सगे सोयऱ्यांचा व्यवसाय एकच आहे त्यामुळे मागेपुढे न पाहता कुणबी दाखले दिले जावेत, न्यायमुर्ती संपत शिंदे समितीला तातडीने मुदतवाढ द्या, दाखल्यांसाठी विशेष कक्ष पुन्हा सुरु करा, आंदोलकरांवरील गुन्हे मागे घ्या, सातारा-औंध-मुंबई-हैद्राबाद गॅझेट लागू करा तसेच आत्महत्या केलेल्या बांधवांच्या कुटुंबाला निधी आणि शासकीय नोकरी द्या, अशा १० मागण्या जरांगे यांनी राज्य शासनाकडे केल्या.

# मित्रांसोबत गेला तो घरी आलाच नाही

## पाण्यात बुडवून मारलं,बीडमध्ये पुन्हा एक खून!



बीड, (प्रतिनिधी) :- आवादा कंपनीच्या खंडणी आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणाने बीड जिल्हा चर्चेच्या केंद्रस्थानी असताना आता पाटोद्यातील खून प्रकरण समोर आले आहे. सौरभ भोंडवे या तरुणाचा त्याच्या मित्रांनी खून केला परंतु तरीही पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नाही, असा गंभीर आरोप कुटुंबियांनी केला आहे. भोंगवे कुटुंबाने सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना याचसंदर्भाने पत्र लिहिले आहे. मित्रांबरोबर बाहेर गेलेल्या सौरभला मी सायंकाळी फोन केला. त्यावेळी त्याचा फोन मित्रांनी उचलला, पण त्यानंतर केलेल्या कोणत्याही फोनला समोरून प्रतिसाद मिळाला नाही. त्याच्या मित्रांनीच त्याला तलावाच्या पाण्यात बुडवून मारला पण जातीयवादी पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नाही, असा गंभीर आरोप सौरभच्या आईने केला आहे. मयत झालेल्या तरुणाचे नाव सौरभ शिवाजी भोंडवे असून २८ वर्षीय सौरभला ४ वर्षाचा मुलगा होता. गोरख आघाव, संभाजी जायभये आणि सागर जाधव या मित्रांबरोबर तो घराबाहेर पडला. सायंकाळी ६.१४ मिनिटाने त्याच्या आईने फोन केला. आजूबाजूला खूप आवाज येत होता. पुन्हा फोन उचलला जात नाही. रात्री हेच मित्र पोलिस स्टेशनला जातात. तिथे सौरभचे वडील भेटल्यावर तिघेही वेगवेगळी उत्तरं देतात आणि दोन दिवस खूप शोध घेतल्यावर प्रेत मिळते. तलावात बुडून मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. १५ तारखेला अंत्यविधी होतो. पोलिस कंप्लेंट () घेतली जात नाही. पोलीस निरीक्षक अनमोल केदार त्यांना म्हणतात एसपींना भेटा, नाहीतर कुठही जाअशी संपूर्ण घटना अंजली दमानिया यांनी ट्विटरवरून कथन केली आहे. परळी पॅटर्न महाराष्ट्रासमोर ▶▶पान २ वर

# पद्म पुरस्कारांची घोषणा



नवी दिल्ली, (वृत्तसेवा) :- प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. सरकारने आरोग्य, खेळ, कला, साहित्य तसेच इतर क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सन्मान केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येच्या भाषणानंतर या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यात महाराष्ट्रातील काही बड्या चेहऱ्यांचाही समावेश आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासह देशाच्या इतरही भागातील वेगवेगळ्या क्षेत्रात अनोखे काम करणाऱ्यांच्या नवांची पद्म पुरस्कारासाठी निवड केली आहे. त्या नावांची आज घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून होमिओपॅथी चिकित्सक डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रात काम करणाऱ्या मारुती चितमपल्ली यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. चैत्राम पवार यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हिंदी लेखक जगदीश जोशीला यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकगायक नरेन सुरंग यांनाही पद्मश्री पुरस्कार ▶▶पान २ वर

# वाल्मीक कराडच्या संपत्तीवर टाच?



## माहिती घेत सर्व मालमत्ता जप्तीसाठी एसआयटीचा विशेष न्यायालयात अर्ज

बीड, (प्रतिनिधी):- बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडच्या अडचणीत वाढ होताना दिसून येत आहे. एसआयटीने कराडची संपूर्ण मालमत्ता जप्त करण्याच्या हालचाली सुरु केली आहे. दरम्यान कराडची सर्व जंगम आणि स्थावर मालमत्तेची जप्ती करण्याची परवानगी मागण्यासाठी विशेष न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम १०७ अंतर्गत अर्ज आधीच न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वाल्मीक कराड यांच्याविरोधातील अनेक गोष्टी समोर येत आहे. रोज नव्या गुन्ह्यात त्यांचे नाव समोर येत असून राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील बेनामी मालमत्ता समोर येत आहे. अशातच सामजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कराड आणि धनंजय मुंडेंच्या एकत्रित मालमत्तेचा सातबारा समोर आणला आहे. यामुळे आता धनंजय मुंडे यांच्या अडचणीतदेखील वाढ होऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. आता एसआयटीला हा अधिकार मिळणार की नाही ह्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाल्मीक कराडची नेमकी कुठे आणि किती संपत्ती आहे याची सर्व माहिती एसआयटीने गोळा केली आहे. याचं रेकॉर्ड समोर येताच आणखी मालमत्ता सील केल्या जातील. जर यानुसार कार्यवाही झाली तर कराडसाठी हा मोठा धक्का ठरू शकतो. गेली अनेक दिवस संतोष देशमुख ▶▶पान २ वर

# दीड एकरात ४ लाख!



## बीडच्या शेतकऱ्याला सापडला बक्कळ कमाईचा फॉर्म्युला

बीड, (प्रतिनिधी):-राठवाड्यातील शेती ही पाण्याअभावी बेभरवशाची मानली जाते. त्यामुळे बहुतांश शेतकरी हे हंगामी शेतीच करतात. बऱ्याचदा बाजारभाव आणि पाऊस यामुळे हाती काहीच लागत नाही. परंतु, बीडच्या एका शेतकऱ्याला यशाचा फॉर्म्युलाच सापडला आहे. बीड जिल्ह्यातील शेतकरी सुंदर राठोड हे कांदा उत्पादक शेतकरी म्हणून चर्चेत हेत. माजलगाव तालुक्यातील माली पारगाव इथे त्यांची शेती असून पूर्वी ते पारंपरिक शेतीच करत होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राठोड यांनी सुरुवातीला अर्धा एकर कांद्याची लागवड केली. यातून त्यांना चांगलं उत्पन्न मिळालं. त्यामुळे त्यांनी दीड एकर शेतात कांदा लावगड केली आणि यातून त्यांना सरासरी चार लाखांपर्यंत उत्पन्न मिळालं. शेतात पाणीटंचाई असल्याने सुरुवातीला विहीर खोदण्याचा निर्णय राठोय यांनी घेतला. परंतु दुर्दैवाने त्या विहिरीला पाणी लागलं नाही. तरीही त्यांनी ▶▶पान २ वर

# शरद पवारांची प्रकृती बिघडली, नियोजित कार्यक्रम रद्द!

मुंबई, (वृत्तसेवा):-राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडली आहे. यामुळे पुढील चार दिवसांचे त्यांचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. एएनआय या वृत्तसंस्थेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार,शरद पवारांना खोकला झाल्याने बोलण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे कार्यक्रमांत त्यांना भाषण देता येत नाही. परिणामी पुढील चार दिवसांचे त्यांचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून ▶▶पान २ वर






# बार्शी नाका थांबा साठी बजरंगी उड्डाण

## खा.बजरंग सोनवणे यांचा रेल्वे कृती समितीला बैठकीत शब्द




बीड, (प्रतिनिधी):-अवघ्या काहीच दिवसात बीडला रेल्वे येत आहे. बीडपर्यंतचा रेल्वे भुसंपादनाचा विषय मार्गी लावला असून १२ मार्च २०२५ च्या संसदीय अधिवेशनासाठी बीडच्या रेल्वेने जाण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यासाठी आवश्यक पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान, बीडमधील बार्शी नाका इमामपुर रोड परिसरात रेल्वेला थांबा देण्याची मागणी समोर आली आहे. खासदार या नात्याने रेल्वे थांबा देण्याची जबाबदारी माझी असून तुम्ही चिंता सोडा, बार्शी नाका येथे रेल्वे थांबा मंजूर करून घेतो, असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे कृती समितीला दिला. यावेळी समितीने त्यांचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.ङ्गयेथील शासकिय विश्रामगृह येथे सायंकाळी ५ वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत रेल्वे कृती समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृती समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी, माजी आ.सय्यद सलिम, मा.आ.उषा दराडे, जेष्ठ नेत्या सुशीला मोराळे, ▶▶पान २ वर

### गंमत भंडारी,मा.आ.दराडेंकडून कौतूक

खा.बजरंग सोनवणे यांनी खासदार झाल्यापासून बीडचे अनेक विषय मांडले. इतके विषय मांडण्याची संधी त्यांना त्यांचा पक्ष देत असून ही बीडसाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशा शब्दात समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी यांनी कौतूक केले तर मा.आ.उषा दराडे यांनी खा.बजरंग सोनवणे यांची बीडच्या विकासाबाबत तळमळ दिसत असून ते ज्या पध्दतीने संसदेत विषय मांडत आहेत, त्याबाबत त्यांचे करावे तितके कौतूक कमी आहे, असे त्यांनी म्हटले.

### कृती समितीसोबत केली पाहणी

बार्शी नाका परिसरातील इमामपुर येथील रेल्वे थांबा हा नियोजीत होता. त्याठिकाणी सायंकाळी साडेसहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांनी कृती समितीसोबत जावून जागेची आणि तेथील कामांची पाहणी केली. याठिकाणी त्यांनी परिसरातून आलेल्या नागरिकांशी संवादही साधला.




CMYK

CMYK



# लाश वही है...



महिला, शेतकरी, पीडित आदींचे कल्याण करण्याच्या नावाखाली सत्ताधीश कसे वाटेल ते गैरव्यवहार करू शकतात याचे उदाहरण म्हणजे 'लोकसत्ता'ने चव्हाट्यावर आणलेले पीक विमा प्रकरण. या योजनेत तब्बल सव्वाचार लाख वा अधिक पीक विमा दावे बोगस असल्याचे दिसून आले. ते ज्यांनी प्रथम 'पाहिले' आणि बोगस असल्याचे मान्य केले त्या कृषी विभागीय अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचे यासाठी प्रथम अभिनंदन. हा इतका निर्लज्ज गैरव्यवहार का आणि कसा झाला त्यावर टिप्पणी करण्याआधी मुळात हे प्रकरण नक्की काय आहे हे लक्षात घ्यावे लागेल. त्यासाठी अगदी साधे प्रश्न: व्यक्तींच्या एकूण संख्येपेक्षा त्यांच्यावर काढलेल्या विम्यांची संख्या जास्त असू शकेल काय? म्हणजे माणसे उदाहरणार्थ १००. आणि विम्यांची संख्या मात्र २००, असे असू शकते काय? किंवा ज्या जमिनींवर पीकच नाही त्या जमिनींचा पीक विमा काढता येईल का? किंवा जी जमीन नदीनाल्यांतील आहे त्या जमिनीवरील 'पिका'चा विमा काढता येतो का? या प्रश्नांचे उत्तर 'नाही' असे जे देऊ शकतील त्यांस महाराष्ट्रातील सध्याचा पीक विमा घोटाळा नक्की काय आहे ते आणि त्याची व्याप्ती, खोली लक्षात येईल. हा घोटाळा गेली दोन वर्षे सुरू असून तो विमा कंपन्या आणि स्थानिक बलदंड राजकारणी यांच्या हातमिळवणीशिवाय होणे अशक्य. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता त्यावर प्रकाशझोत टाकणे कर्तव्य ठरते. निवडणुकीच्या तोंडावर जाहीर झालेल्या 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणे या पीक विमा घोटाळ्याचेही मूळ आहे ते शेतकरी-नामे मतपेढी आपल्याकडे कशी वळवता येईल या क्षुद्र विचारात. ज्याप्रमाणे राज्यातील महिलांनी सरकारकडे भाऊबीजेची भीक मागितलेली नव्हती त्याप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांनी आम्हास अत्यल्प रकमेत पीक विमा सुविधा द्या अशी मागणी केली नव्हती. तरीही राज्य सरकारने लाडकी बहीण योजना आणली आणि शेतकऱ्यांसाठी अवघ्या एक रुपयात पीक विमा योजना जाहीर केली. आता बोगस लाडक्या बहिणी शोधण्याचा उद्योग ज्याप्रमाणे सरकारला करावा लागत आहे, त्याप्रमाणे या बोगस विमाधारकांसही हुडकून काढण्याची मोहीम सरकारला हाती घ्यावी लागली. दोहोंत फरक इतकाच की कृषी सचिवांनी साडेचार लाख शेतकरी विमा बोगस असल्याचे मान्य केले. वास्तविक त्याआधीही शेतकऱ्यांसाठी अत्यल्प खर्चात पीक विम्याची सोय होती. त्यासाठी शेतकऱ्यांस संरक्षित पीक विमा रकमेच्या दीड टक्का, दोन टक्के असे शुल्क आकारले जात असे. ज्या भागातील पीकपाण्यास नैसर्गिक संकटांचा धोका अधिक, तेथील शेतकऱ्यांसाठी विमा योजना अधिकाधिक आकर्षित करणे हा यामागील उद्देश. तो रास्तच. खरे तर शेतकऱ्यांनी त्याचीही मागणी केलेली नाही. तरीही शेतकऱ्यांवर अनुदानांचा वर्षाव करण्याची सत्ताधाऱ्यांची सवय काही जात नाही. मग सत्ताधारी पक्ष कोणताही असो. शेतकऱ्यांस जे हवे आहे ते- म्हणजे त्यांच्या पिकास रास्त भाव मिळेल अशी व्यवस्था-करायचे नाही आणि हे अनुदानांचे औदार्य दाखवायचे. तसे करणे आपल्या सर्वच राजकीय पक्षांस आवडते. शहाण्या कृतीचे श्रेय मागता येत नाही; अनुदाने दिल्याचे मिरवता येते. तेच येथे झाले. केंद्राच्या मूळच्या पीक विमा सवलतींवर आपण आणखी सवलत द्यायला हवी असे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांस वाटले. त्यामुळे त्यांनी सर्व शेतकऱ्यांसाठी फक्त एक रुपयात पीक विमा देण्याची घोषणा केली. यानंतर या राज्यात विम्याचे असे काही पीक आले की त्यास तोड नाही. हा असा एक रुपयात विमा येण्याआधी २०२२ च्या खरीप हंगामात पीक विमा काढणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या होती ९६ लाखांच्या आसपास. नंतर राज्य सरकारच्या औदार्याने हा एक रुपयी विमा सुरू झाला आणि ही संख्या झाली एक कोटी ६८ लाख. यात अक्षरश: कोणीही आणि कोणासाठीही अर्ज भरले. एकेका शेतकऱ्याच्या एकाच सातबाऱ्यावर अनेक अर्ज जसे भरले गेले तसेच शहरात वास्तव्यास असणाऱ्यांच्या नावे ग्रामीण भागात विमा अर्ज भरले गेले. हे लाडक्या बहिणींसारखेच झाले. केवळ महिला असणे हाच जसा शेवटी-शेवटी 'लाडकी बहीण' योजनेतून सरकारी भाऊबीज लुटण्याचा निकष बनला तसाच शेतकरी असल्याचा दावा पीक विम्यासाठी पुरेसा मानला गेला. खरे तर इतक्या साऱ्या शेतकऱ्यांस नुकसानभरपाई द्यावयाची वेळ आल्यास आपल्या पोटास चिमटा बसेल हे लक्षात घेऊन विमा कंपन्यांनी त्या वेळी जागरूकता दाखवायला हवी होती. पण ते कसे होणार? कारण या विमा कंपन्यांच्या स्थानिक अधिकारी/कर्मचाऱ्यांचे राजकीय साटेलोटे. स्थानिक दबंग राजकारण्यांस 'आपल्या' अधिकाधिक शेतकऱ्यांस विमा कवच देण्यात रस. या अशा राजकारण्यांनी या विमा अधिकाऱ्यांशी संधान बांधले आणि आपले अधिकाधिक अर्जदार राहतील याची खबरदारी घेतली. अशा साट्यालोट्याचे उच्च दर्जाचे उदाहरण म्हणजे बीड. शेतकऱ्याच्या एका विमा अर्जापोटी सरकारी सामूहिक सेवा केंद्रास ४० रुपये मिळतात. हाही आतबट्ट्याचाच व्यवहार. राज्यातील ९६ सेवा केंद्रांवरून असे बोगस अर्ज आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. त्यातील ३६ केंद्रे एकट्या बीड जिल्ह्यातील आहेत. या बीडमधील केंद्राने परभणी, नांदेड येथील शेतकऱ्यांच्या नावेही विमा अर्ज भरल्याचे दिसते. सांप्रती अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी सेवेत असलेले धनंजय मुंडे हे बीडचे प्रतिनिधित्व करतात आणि ते 'त्या' काळात कृषीमंत्रीही होते हा केवळ योगायोग ! या टप्प्यावर हा घोटाळा ३५० कोटी रुपयांचा असेल असा अंदाज वर्तवला जातो. पण हे हिमनगाचे टोक असू शकते. याचे कारण याआधी हाताळले गेलेले विम्याचे दावे इत्यादी बाबी लक्षात घेतल्यास ही रक्कम कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे. यात पंचाईत अशी की इतक्या चार-सव्वाचार लाख बोगस बळीराजांवर कारवाईही करता येणे अशक्य. कारण शक्यता ही की यातील अनेकांच्या नावे दुसऱ्याच कोणी विमा अर्ज केलेला असणार. कित्येक शेतकऱ्यांस आपल्या नावे असे अर्ज दिले गेल्याचे माहीतही नसेल. तेव्हा यांचा शोध घेणार कसा आणि कोण? म्हणजे आणखी एका घोटाळ्याकडे महाराष्ट्रीय जनतेने दुर्लक्ष करायचे याआधी 'लोकसत्ता'ने एसटी बस खरेदीचा घोटाळा उघडकीस आणला. राज्य सरकारने त्याची दखल घेत ती निविदाच रद्द केली. त्याप्रमाणे या विमा घोटाळ्याचीही चौकशी व्हायला हवी आणि त्यात विमा कंपन्यांच्या सहभागाचीही दखल घ्यायला हवी. सत्ताधाऱ्यांनी खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांस हाताशी धरून केलेली ही लूट आहे. इतके करून राज्यातील शेतीचे उत्तम चाललेले आहे असे म्हणण्यासारखी परिस्थिती असती तर या मंडळींच्या या कृष्णकृत्यांकडे एक वेळ दुर्लक्ष करता आले असते. ती सोयही आपणास नाही. तेव्हा सत्ताधीशांच्या या राजकीय कंडू शमनाचा खर्च नागरिकांनी किती सहन करायचा हा एक प्रश्न या निमित्ताने विचारात घ्यायला हवा. एसटी बस घोटाळ्याशी शिवसेना नेत्याचा संबंध होता तर बोगस पीक विमा योजना राष्ट्रवादी नेत्याशी संबंधित आहे. हे दोनही पक्ष नित्यनैतिक भाजपचे डावे-उजवे सत्ता साथीदार आणि भागीदार. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात कारवाईची हिंमत दाखवायला हवी. फडणवीस विरोधी पक्षात असताना ज्यांच्या भ्रष्टाचाराविरोधात लढले तेच आता त्यांच्याच मांडीला मांडी लावून तसाच भ्रष्टाचार करत असतील तर ''लाश वही है; सिर्फ कफन बदला है'' असे म्हणण्याची वेळ येईल.

# नवमतदार हे देशाचे भविष्य - जिल्हाधिकारी अविनाथ पाठक

## मतदार दिनानिमित्त निघाली रॅली

बीड, दि. २५ (जि. मा. का.):-नवयुवक आणि नवमतदार येत्या काळात देशाचे भवितव्य आहेत त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रॅलीला हिरवी झेंडी दाखवून त्यांनी सुरुवात केली याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेश सुर्यवंशी, तहसीलदार चंद्रकांत शेळके,नायब तहसीलदार सुरेंद्र डोके इतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की, देश हा महासत्ता बनू पाहतोय राष्ट्रीय मतदार दिनाच्या जनजागृतीत नवयुवकांचा असलेला सहभाग पुढील निवडणूकीत बीडचे चित्र पालटून दाखवेल. या रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणातून सुरुवात होऊन शिवाजी पुतळा येथुन समाज कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला. रॅलीच्या समारोप प्रसंगी चंपावती विद्यालयाची विद्यार्थीनी नम्रता तांबे म्हणाली की




बीड जिल्हा हा आता केवळ उसतोड कामगारांचा जिल्हा राहिलेला नसून या जिल्हयाने उत्कृष्ट खेळाडू, उत्तम प्रकारचे अधिकारी निर्माण करुन बीड जिल्हयाला ख-या अर्थाने पुढे नेले असून आपली बीडकर अशी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दृष्टीकोण बदलला पाहिजे असे तीने आपल्या मनोगतात व्यक्त केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सन्मानचिन्ह देऊन नम्रता तांबे हिचा गौरव केला. राष्ट्रीय मतदार दिनाच्या रॅलीत विविध शाळेने उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.

# एसटीच्या तिकीट दरात वाढ,ठाकरे गट आक्रमक

## अंबादास दानवेंनी दिला 'हा' मोठा इशारा

मुंबई, (वृत्तसेवा):- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या दोन महिन्यांतच सर्वसामान्यांना राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बस तसेच रिक्षा-टॅक्सी भाडेवाढीचा फटका बसला आहे. एसटीच्या तिकीट दरात शुक्रवारी मध्यरात्रीपासून १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय राज्य परिवहन मंडळाने घेतला आहे. या बरोबरच राज्यभरात रिक्षा व टॅक्सीच्या किमान भाड्यात प्रत्येकी तीन रुपये दरवाढ करण्यात आली आहे. तसेच रिक्षा व टॅक्सीच्या तिकीटासंदर्भातील १ फेब्रुवारीपासून नवे दर लागू होणार आहेत. दरम्यान, सरकारच्या या निर्णयामुळे आधीच वाढत्या महागाईत होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना मोठा फटका बसणार आहे. आता एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यभरातून अनेकांनी प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आता शिवसेना ठाकरे गटानेही याबाबत आक्रमक भूमिका घेत राज्य सरकारला मोठा इशारा दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. ''तीन महिन्यांपूर्वी एसटी महामंडळाच्या उपाध्यक्षांनी एसटी फायद्यात आहे, एसटीची सेवा खूप चांगली सुरु आहे. अशा प्रकारची घोषणा केली होती. त्यानंतर हिवाळी अधिवेशनात एसटीचा २ हजार ८०० कोटींचा भ्रष्टाचार आम्ही समोर आणण्याचं काम केलं. ज्या पद्धतीने खासगी बसेस चालतात. आधीची बस ४४ रुपये प्रति किलोमीटर ते ही डिझेलवर चालते. मग सरकारने एक नवीन करार केला होता, त्यामध्ये ३५ रुपये प्रति किलोमीटर विना डिझेल, १ हजार ३१० बसेस घेतल्या जात होत्या. मात्र, त्यानंतर आम्ही आवाज उठवला. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही प्रक्रिया थांबवली. याचा अर्थ एकीकडे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो आणि दुसरीकडे एसटी बस तोट्यात गेली असं सांगितलं जातं. अशा परिस्थितीमुळे प्रवाशांच्या खिशाला कात्री लागते. शिवसेना या विषयी आंदोलन करणार आहे'', असा इशारा अंबादास दानवे यांनी दिला. दरम्यान, काही दिवसांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारकडून नागरिकांवर विविध सवलतींची खैरात झाली होती. मात्र, नवे सरकार स्थापन होताच नागरिकांना दरवाढीचे चटके बसू लागले आहेत. एसटीच्या तिकीट दरात १४.९५ टक्के वाढ करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. ही दरवाढ मध्यरात्रीपासूनच लागू झाली, तर रिक्षा व टॅक्सीच्या भाड्यामध्ये १ फेब्रुवारीपासून वाढ केली जाईल. एसटीची भाडेवाढ यापूर्वी ऑक्टोबर २०२१ मध्ये, तर रिक्षा व टॅक्सीची भाडेवाढ सप्टेंबर २०२२ मध्ये करण्यात आली होती. परिवहन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत दरवाढीला मान्यता देण्यात आली. त्यामुळे राज्यभरातील अनेक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## पान १ वरून

### मराठ्यांना सरसकट...

संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायासाठी मुंबईत आक्रोश मोर्चा होत असताना जालन्याच्या अंबडमधील आंतरवाली सराटीमध्ये विक्रमी आठव्यांदा आमरण उपोषणाला जरांगे यांनी सुरुवात केली. याआधी माझी तब्येत बिघडल्यावर लोक गर्दी करायचे पण यावेळी उपोषणाच्या पहिल्याच दिवशी मंडप गर्दीने फुलून गेला आहे. तुम्ही उपोषणाला बसला नाहीत तरी चालेल, फक्त मला आशीर्वाद द्या, असे जरांगे म्हणाले. राज्य सरकारने मराठ्यांशी बेईमानी आणि हद्दारी करू नये. आज जरी केवळ आंतरवालीत उपोषण सुरू झालेले असेल तरी सामूहिक आंदोलनाचे लोण आता राज्यात पसरेल. मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील मराठ्यांशी गद्दारी करणार नाहीत, अशी अपेक्षा आहे, असे जरांगे म्हणाले. मराठा बांधवांना माझी विनंती आहे की कुटुंबाने परवानगी दिली नसेल तर उपोषणाला बसू नका. मी एकटाच उपोषण करायला पुरेसा आहे. केवळ तुमचा आशीर्वाद आणि साथ मला द्या, असे आवाहन जरांगे यांनी केले. तसेच उपोषण सुरू करण्यापूर्वी सरकारशी कोणतेही बोलणे झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

### मित्रांसोबत गेला...

आणलेले आमदार सुरेश धस यांच्या सांगण्यावरून पाटोदा खुनाची फक्त लेखी तक्रार पोलिसांनी घेतली आहे. ५ महिने झाले तरी अजून न्याय मिळत नाही. कुणाच्या सांगण्यामुळे ही तक्रार घेतली गेली नाही? याचे प्रश्नाचे उत्तर पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांना द्यावे लागेल, असे दमानिया म्हणाल्या.

### पद्म पुरस्कारांची...

जाहीर करण्यात आला आहे. पैरो सिंह चौहान यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यासह कर्नाटकचे लोकगायक वेंकप्पा अंबाजी यांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सम्नान केला जाणार आहे.

### वाल्मीक कराडच्या संपत्तीवर...

हत्या प्रकरणामुळे राज्याचे वातावरण ढवळून निघाले आहे. वाल्मीक कराडवर मकोकाची कारवाई करण्यात आली आहे. या कायद्यामधील तरतुदीनुसार कराडची मालमत्ता जप्त केली जाऊ शकते. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांचे अनेक ठिकाणी संयुक्त भूखंड असल्याचा दावा भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस आणि अंजली दमानिया यांनी केला आहे, यामुळे आता हे या संपत्तीवर जप्तीची टागती तलवार आहे. वाल्मीक कराडवरील कारवाईने धनंजय मुंडेंच्या अडचणीत यामुळे वाढ होऊ शकते. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जमा करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. मात्र, त्यात वाल्मीक कराडचे नाव आहे की नाही? याची स्पष्टता त्यांनी दिलेली नाही. त्यामुळे वाल्मीक कराडची संपत्ती जप्त होणार की नाही? असा सवाल त्यावेळी अंजली दमानियांनी केला. बीड जिल्ह्यातच अनेक ठिकाणी घरातील काम करणाऱ्या व्यक्तीपासून तर वॉचमनच्या नावावर जमीनीचे २० ते २५ एकरचे तुकडे आहेत अशी चर्चा आहे. वाल्मीक कराडने पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज रोडवर एका इमारतीत ऑफिससाठी जागा घेतल्याचे समोर आले आहे. ही गुंतवणूक वाल्मीकने एका महिलेच्या नावावर केल्याचे उघड झाले असून या महिलेचे नाव ज्योती जाधव असे आहे. फर्ग्युसन कॉलेज रोडवर कुशल वॉल स्ट्रीट या इयमरातीचे काम सुरू आहे. त्या ठिकाणी काम सुरू होतानाच वाल्मीक कराडने इथे गुंतवणूक केली. या इमारतीत ऑफिस नंबर ६१० सी हे अपार्टमेंट असून त्यात ४५.७१ चौ.मी कार्पेट एरिया एवढ्या जागेचे आलिशान ऑफिस घेतले आहे. विशेष म्हणजे या ऑफिसला बाल्कनी असून पार्किंगसाठी देखील जागा देण्यात आली आहे. वाल्मीकचे दुसरे ऑफिस नंबर ६११ बी या अपार्टमेंटमध्ये असून त्याचे कार्पेट एरिया ५४.५१ चौ.मी एवढे आहे. यात देखील पार्किंगची सुविधाआहे. हा एकूण २५ कोटींचा व्यवहार झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, आता प्रश्न हा उपस्थित होत आहे की या महिलेचा वाल्मीक कराडशी काय संबंध आहे? या प्रकरणात ईडीकडून चौकशी होऊ शकते. महाराष्ट्राचे अन्न व नागरीपुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडवर अखेर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी निगडीत खंडणी प्रकरण आणि हत्येच्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे. फरार आरोपींची संपत्ती जमा करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. मात्र, त्यात वाल्मीक कराडचे नाव आहे की नाही? याची स्पष्टता त्यांनी दिलेली नाही. त्यामुळे वाल्मीक कराडची संपत्ती जप्त होणार की नाही? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला होता. यानंतर आता मकोकाची कारवाई करण्यात आल्यावर कराडांच्या नावे असलेली संपत्ती जप्त करणार येणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अंजली दमानिया यांनी ट्विट करत धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांची एकत्र जमीन! असल्याचा दावा केला आहे. जमीनीचा सातबाराच त्यांनी आपल्या सोशल मिडीयावर प्रसारित केला. अन्? म्हटलंय की, हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र जगमित्र शुगर्स चे ६ सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले ३५५४ गुंठे जमीन (८८ एकर ३४ गुंठे) जमीन एकत्र असल्याचा दावा केला आहे. यामुळे आता धनंजय मुंडेंच्या जमीनवर जप्ती येणार का असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. संघटित गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकारने १९९९ मध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लागू केला. खंडणी, खंडणीसाठी अपहरण, खून किंवा खुनाचा प्रयत्न, धमक्या, खंडणी आणि बेहिशोबी पैसे कमविणारी कोणतीही बेकायदेशीर कृती अशा प्रकारचे संघटित गुन्हे या कायद्याच्या कक्षेत येतात.

### दीड एकरात...

हार न मानता पुढील प्रयत्न चालू ठेवले. बोअरवेल खोदल्यावर शेवटी पाणी लागलं आणि त्यातून ते पाण्याचं योग्य नियोजन करून शेती करतात. गेल्या काही वर्षांत ते कांद्याची शेती करत असून आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन आणि बाजारपेठेचा अभ्यास करून त्यांना यशाचा फॉर्म्युला सापडला आहे. त्यांचा शेतीसाठीचा हाच फॉर्म्युला अनेक शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतोय.

### शरद पवारांची...

देण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार राज्यातील विविध जिल्ह्यांत दौऱ्यावर आहेत. पुण्यातील दोन कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर दिसले होते, तेव्हाही अनेक चर्चांना उधाण आले होते. त्यानंतर, काल त्यांनी कोल्हापुरातील एका कार्यक्रमात हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांनी उद्धव ठाकरेंनी आगामी पालिकेच्या निवडणुकांमध्ये दिलेला स्वबळाचा नारा टोकाचा वाटत नसल्याचं ते म्हणाले. तसंच, अमित शाहांनी केलेल्या टीकेवरही त्यांनी प्रत्युत्तर दिलं. महाविकास आघाडीतील काही आमदार, खासदार आमच्याकडे प्रवेश करणार आहेत, असे विधान उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दावोस येथे केले. त्यांच्या दाव्याला उत्तर देताना पवार यांनी, सामंत हे तिकडे उद्योगातील गुंतवणूक आणण्यासाठी गेले आहेत, की पक्ष फोडायला? ते आमदार, खासदार कधी फुटतात याचीच वाट पाहतोय, अशी मिश्कील शेरेबाजी त्यांनी केल्यावर हास्य पसरले. मी राज्याचा मुख्यमंत्री असताना मीदेखील दावोसला गेलो होतो, असा उल्लेख करून पवार म्हणाले, की काल झालेल्या करारांपैकी अनेक कंपन्यांचे करार तीन वर्षांपूर्वी झाले होते. जिंदाल कंपनी ही महाराष्ट्रातील असताना त्यांच्याशी दावोसमध्ये करार केल्याचे दिसते. इथल्याच कंपन्यांना तिकडे नेऊन करार करायचा आणि महाराष्ट्रात गुंतवणूक झाल्याचा देखावा करण्यात आला. याला फसवणूक म्हणता येणार नाही. मात्र, ज्यांना गुंतवणूक करायची आहेल त्यांना महाराष्ट्रात एकत्र करायला हवे होते, असेही पवार म्हणाले.

### बार्शी नाका थांबा...

शिवसेना जिल्हाप्रमूख स्वप्नील गलधर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भागवत तावरे, खुर्शीद आलम, सुनील सुरवसे, बी.बी.जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी यांनी रेल्वे थांबा कसा गरजेचा आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी माजी आ.सय्यद सलिम, मा.आ.उषा दराडे, जेष्ठ नेत्या सुशीला मोराळे यांनीही आपली मते मांडली. यानंतर बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, रेल्वे हा बीडच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. मागील अनेक वर्षांपासून अनेकांनी यासाठी लढा दिला आहे. जेल भोगले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी मला खासदार म्हणून संधी दिल्यानंतर दोनच दिवसात पहिली बैठक रेल्वेची लावली. याच बैठकीत रेल्वेचा आढावा घेत रेल्वे अधिकाऱ्यांकडून रेल्वे आणण्यासाठी कालावधी ठरवून दिला. पहिला टप्पा अंमळनेर ते विघनवाडी, विघनवाडी ते नवगण राजुरी असे दोन टप्पे पुर्ण केले. आता रेल्वे बीडला येत आहे. २६ जानेवारीपर्यंत रेल्वे बीडला आली असती मात्र, एकदोन भुसंपादनाच्या विषयात अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्याने रेल्वे आज येऊ शकली नाही. मात्र, भुसंपादनाचे विषय मार्गी लावले असून आता अवघ्या काही दिवसात रेल्वे बीडला येईल. शिवाय याच महिनाभरात बीड ते अहिल्यानंतर रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न आहे. याच बरोबर मार्चअखेर ही रेल्वे वडवणीपर्यंत धावेल. तर जून-जुलैमध्ये सिरसाळापर्यंत रेल्वे धावले आणि मार्च २०२६ पर्यंत रेल्वे परळीपर्यंत पोहचेल, असे काम करून घेण्यासाठी आपण पाठपुरावा करत आहोत. दरम्यान, बीडमध्ये पालवन भागात रेल्वे स्टेशन तयार झाले असून बार्शी नाका इमामपुर भागात रेल्वे थांबा देण्याची मागणी देखील पुढे आलेली आहे. यासाठी रेल्वे कृती समितीला सोबत घेवून आपण हे रेल्वे स्टेशन मंजूर करून घेवू, त्यासाठी आंदोलन वगैरे करायची गरज नाही. हा विषय माझी जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी आपण पुर्ण करून रेल्वे स्टेशन मंजूर करून घेऊ, असा शब्द यावेळी दिला. * तीन कामांचा केला उल्लेख : बीड रेल्वे कृती समितीसोबत चर्चा करताना खा.बजरंग सोनवणे यांनी तीन कामांचा उल्लेख केला. यात रेल्वेचे काम वेळेत करून घेणे, धारूरच्या घाटाचे कटींग-पालखी मार्गातील घाटाचे काम करून घेणे, बीडला दुसरा बायपास मंजूर करून घेणे, ही तीन कामे करून घेणे, हे या वर्षातील ध्येय असल्याचा उल्लेख त्यांनी केला. * धाराशीव- जालना रेल्वेसाठी करणार प्रयत्न : अहिल्यानंतर परळी रेल्वेमार्गाचे काम आता मार्गी लागत असून येणाऱ्या काळात धाराशीव-जालना या रेल्वेमार्गासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. हा मार्ग केवळ १८० किलोमिटरचा असून हा जोडला तर सर्वात मोठे काम बीडसाठी होणार आहे. हे करण्यासाठी आपण रेल्वेमंत्र्यांना लवकरच भेटत असून याची या पाच वर्षात सुरूवात जरी झाली तरी समाधान असेल, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले. * कृती समितीने काय म्हटलेय निवेदनात : अनेक वर्षे पर्वीच सदरील स्टेशन बार्शी नाका येथे मंजूर आहे. बार्शी नाका स्टेशनला ६० टक्के गायरान जागा उपलब्ध आहे. तसंच ज्यांच्या मालकीची जमीन जाणार आहे. त्यांना पूर्ण मावेजा दिले गेले आहे. त्यामुळे विना खर्च स्टेशन तयार मिळणार आहे. या पुर्वीच ४.२२ कोटी खर्च करुन येथे स्टेशन बांधलेले आहे. सदरील स्टेशनला रेल्वे ट्रॅक बनून तयार आहे.ङ्गसदरील स्टेशनलगत हायवे नं.२२२ व २११. तसेच बायपास व बीड ते नेकनूर १०० फुट रस्ते तयार असल्यामुळे ट्रॉफीक होणार नाही.नविन व जुना मॉंढा जवळ आहे. जिल्हा रुग्णालय जवळ आहे. बस स्टॅन्ड जवळ आहे.९० टक्के शाळा, महाविद्यालय जवळ आहे.शहरातील व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यासाठी सोईचे स्टेशन आहे.ङ्गशहरातील गरीब कष्ट करणाऱ्या कामगारासाठी सोईचे स्टेशन आहे.ङ्गसोलापूर-जळगाव रेल्वेमार्ग झाल्यास जंक्शनसाठी योग्य राहील.ङ्गबार्शी नाका स्टेशनला चार आणे खर्च केले की स्टेशन तयार.पालवण येथे नवीन स्टेशन जागी हजारो प्लॉटधारकांना संपादीत करुन मावेजा वाटप करावा लागेल. येथील जमिनीचे भाव जास्त असून येथे काही बांधकामेही झालेली आहेत. यामुळे रेल्वेचा खर्च वाढेल व रेल्वेसाठी विलंब होऊ शकतो. सातही तालुक्यासाठी अत्यंत सोयीसकर ठरेल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

CMYK

# शोक सराफ, आर अश्विनला पद्मश्री, मनोहर जोशी यांना मरणोत्तर पद्मभूषण

केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि भारताचा फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यांचा पद्मश्री पुरस्काराने सन्मान करण्यात आलाय. तर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलंय.




## २०२५ महाराष्ट्रातील पद्म पुरस्कार विजेते

### पद्मभूषण

१. मनोहर जोशी (मरणोत्तर)
२. पंकज उधास (मरणोत्तर)
३. शेखर कपूर

### पद्मश्री

१. अच्युत पालव – कला
२. अरुंधती भट्टाचार्य – व्यापार आणि उद्योग
३. अशोक सराफ – कला
४. अश्विनी भिडे देशपांडे – कला
५. चैतराम पवार – सामाजिक कार्य
६. जसपिंदर नरुला – कला
७. मारुती चितमपल्ली – साहित्य
८. रानेंद्र भानू मुजुमदार – कला
९. सुभाष खेतुलाल शर्मा – कृषी
१०. वासुदेव कामत – कला
११. विलास डांगरे – वैद्यकीय


### सात जणांना पद्मविभूषण पुरस्कार

धुव्वूर नागेश्वर रेड्डी (वैद्यकीय)
न्यायमूर्ती (निवृत्त) जगदीश सिंह खेहार (सार्वजनिक व्यवहार)
कुमुदिनी रजनिकांत लाखिया (कला)
लक्ष्मीनारायणा सुब्रमणियम (कला)
एम टी वासुदेवन नायर (मरणोत्तर) (साहित्य आणि शिक्षण)
ओसामू सुझीकी (मरणोत्तर) (व्यापार आणि उद्योग)
शारदा सिन्हा (मरणोत्तर) (कला)

### १९ जणांना पद्मविभूषण

सूर्य प्रकाश (साहित्य, शिक्षण, पत्रकारिता
आनंत नाग (कला)
बिवेक देबरोय (मरणोत्तर) (साहित्य आणि शिक्षण)
जतीन गोस्वामी (कला)
जोश चाको पेरियापूरम (वैद्यकीय)
कैलाश नाथ दीक्षित (पुरातत्त्व)
मनोहर जोशी (मरणोत्तर) (सार्वजनिक व्यवहार)
नाल्ली छेट्टी (उद्योग, व्यापार)
नंदमुराई बलकृष्णा (कला
पी आर श्रीजेश (खेळ)
पंकज पटेल (उद्योग, व्यापार)
पंजक उधास (मरणोत्तर) (कला)
रामबहादुर राय (साहित्य, शिक्षण, पत्रकारिता)
साध्वी ऋतंभरा (समाजकाय)
एस अजिथ कुमार (कला)
शेखर कपूर (कला)
शोबाना चंद्रकुमार (कला)
सुशीलकुमार मोदी (मरणोत्तर) (सार्वजनिक व्यावरहार)
विनोद धाम (विज्ञान आणि अभियांत्रिकी)

## सैनिक कल्याण सेवा आता ऑनलाईन; नावनोंदणी करण्याचे आवाहन



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीर नारी, वीर माता, वीर पिता व अवलंबित यांची सैनिक कल्याण कार्यालयातील, सैनिक विभागातील तसेच केंद्रीय सैनिक बोर्डातील सर्व कामे येत्या एका महिन्याच्या काळात ऑनलाईन होणार आहेत. त्यामुळे सर्वांनी सैनिक कल्याण विभाग पोर्टल वर नोंद करुन अर्ज व अपलोड केलेल्या सर्व संबंधित कागद पत्राची प्रत व दोन (2.5X2 सेमी) साईजचे लाल पार्श्वभूमी असलेले फोटो जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे द्यावे. त्यामुळे दि.१ फेब्रुवारी पासून शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यास अडचण उद्भवणार नाही. ऑनलाईन नाव नोंदणी (On Line Registration) करण्यासाठी www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन DSW Portalda Register करावे त्यानंतर Register ESM / Register Dependent / Register Orphan / Register widow मध्ये जाऊन आपली नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ०२४०-२३७०३१३ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांनी केले आहे.



कोल्हापूर : अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्याला नागरिकांनी चोप दिलाय. गेल्या काही दिवसांपासून काही विकृतांनी मुलींची छेड काढत हुल्लडबाजी केली होती. त्यानंतर गडहिंग्लज एसटी स्टँड समोर अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्याला नागरिकांनी दिला चोप दिल्याचे समोर आले आहे. दरम्यान, नागरिकांनी संबंधित छेड काढणाऱ्याला चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केलंय. गेल्या काही दिवसांपासून गडहिंग्लज परिसरात मुलींची छेड काढण्याचे प्रमाण वाढलंय. गेल्या आठ दिवसातील मुलींची छेड काढण्याचा दुसरा प्रकार समोर आलाय. त्यामुळे संतापलेल्या नागरिकांनी छेड काढणाऱ्यास चोप देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता पोलीस प्रशासन देखील सतर्क झालंय. पोलिसांनी उडाणटप्पू तरुणांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, या घटनेनंतर गडहिंग्लजमधील एसटी स्टँड परिसरात गर्दी झालेली पाहायला मिळाली.

## परभणीवरून मुंबईच्या दिशेने निघालेल्या लाँग मार्च मधील कारला धडक; थोडक्यात बचावले आंदोलक



**परभणी । प्रतिनिधी**

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ परभणी ते मुंबई लाँग मार्च निघाला होता. दरम्यान हा लाँग मार्च परभणीहून मुंबईच्या दिशेने जात असताना एक अपघाताची घटना घडली आहे. यात मार्च चे नेतृत्व करणारे आशिष वाकोडे यांचा जालना जिल्ह्यातील शेलगाव या ठिकाणी लाँग मार्च आला असता रस्त्याने येणाऱ्या एका भरधाव कार ने आशिष वाकोडे यांना धडक दिल्याची घटना घडलीय. ही धडक लागल्याने ते जखमी झाल्याचीही माहिती पुढे आली आहे. सध्या त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र सुदैवाने या अपघातात अन्य कुठल्याही आंदोलकांना गंभीर स्वरूपाची दुखापत झालेली नाही.

## स्वच्छता प्रिय अण्णाराव खोडेवाड यांच्या हातात झाडू

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड हे दिंद्रुड पोलीस स्टेशन चा परिसर स्वच्छ व सुंदर रहावा यासाठी सदैव अग्रेसर असतात. शनिवारी खोडेवाड यांनी हातात झाडू घेत दिंद्रुड पोलीस स्टेशन चा परिसर स्वच्छ केला. बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा सर्व भार जिल्ह्यातील पोलीस प्रशासनावर आहे. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि अण्णाराव खोडेवाड पोलीस हद्दीतील प्रत्येक घडामोडींवर विशेष लक्ष ठेवून आहेत. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सतर्क राहत दिंद्रुड पोलीस हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात अद्याप खोडेवाड यशस्वी ठरले आहेत. पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ व सुंदर रहावा यासाठी या अधिकाऱ्याने गेल्या दोन वर्षात अनेक स्वच्छता मोहिमी राबवल्या. शनिवारी सकाळी पोलीस ठाण्यासमोरील रस्ता सपोनि अण्णाराव खोडेवाड, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे सह दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी झाडून स्वच्छ केला. दिंद्रुड ग्रामस्थात सपोनि अण्णाराव खोडेवाड यांची यामुळे स्तुती होताना पाहायला मिळत आहे.


महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.परळी वै, जि.बीड**
पत्ता: प्रयाग निवास बिल्डींग दुसरा मजला, घरणीकर रोड, महाराष्ट्र ग्रामीण बँक बाजुला, ता.परळी वै. जि.बीड, Email: arparali17@gmail.com

जा.क्र./सनिप/प्रशासन/प्रा.म.यादी/ क वर्ग/कार्यक्रम/2025. दि. 24/01/2025.

**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम 2017 चे नियम 76 नुसार "क" वर्गात मोडणा-या सहकारी संस्थांच्या सन 2025-2030 करीता होणा-या संचालक मंडळाच्या निवडणूकी**

**प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम**
खालील संस्थांच्या प्रारुप मतदार याद्या अंतिम करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

**संस्थेचे नाव :- ज्ञानेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड**

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | 27/01/2025 | सकाळी 11.00 वाजता | संस्था कार्यालय व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.परळी वै यांचे कार्यालय |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप हरकत मागविणे | 27/01/2025 ते 04/02/2025 | कार्यालयीन वेळेत | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.परळी वै यांचे कार्यालय **पत्ता** : प्रयाग निवास बिल्डींग दुसरा मजला, घरणीकर रोड, महाराष्ट्र ग्रामीण बँक बाजुला, ता.परळी वै. जि.बीड |
| 3 | प्राप्त हरकती व आक्षेपवर सुनावणी घेणे | 06/02/2025 | दुपारी 2.30 वाजता | |
| 4 | प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकती वर निर्णय घेणे | 10/02/2025 | कार्यालयीन वेळेत | |
| 5 | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | 10/02/2025 | सकाळी 11.00 वाजता | संस्था कार्यालय व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.परळी वै यांचे कार्यालय |

संस्थेच्या कोणत्याही सभासदाने मतदार यादी बाबत कांही दावे किंवा आक्षेप असल्यास किंवा यादीतील नाव, पत्ता, किंवा इतरत तपशील या बाबत कोणतीही हरकत किंवा चूक असल्यास विहित कालावधीत **(सार्वजनिक सुट्ट्यावगळून)** योग्य त्या पुराव्यानिशी **आक्षेप / हरकत अर्ज तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.परळी वै** यांचे कार्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. पुराव्याशिवाय दाखल केलेले आक्षेप अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
**दिनांक.**24/01/2025.
**स्थळ :-** परळी वै.

(आर बी कातळे)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.परळी वै


## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द व बुद्रुक ची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ या वर्षा साठी शैक्षणिक सहलीचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द व बुद्रुक यांनी छत्रपती संभाजीनगर व परिसर या ठिकाणी केले होते. सदर सहली मध्ये भद्रा मारुती, घृष्णेश्वर मंदिर, वेरूळची लेणी, देवगिरी किल्ला, सिद्धार्थ गार्डन, प्राणी संग्रहालय, पानचक्की, बीबी का मकबरा, एकनाथ महाराजांचे समाधी स्थळ पैठण आदी ठिकाणी भेटी देण्यात आल्या. व तेथील सर्व माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सदर सहलीमध्ये दोन्ही शाळेचे मिळून ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

सदर सहल शिक्षणाधिकारी श्री फुलारी साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री समंदर खान साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, केंद्रप्रमुख श्री जलील शेख, नागपूर खुर्द सरपंच नारायण साळुंके, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके, आदींच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्व धार्मिक, सांस्कृतिक ऐतिहासिक, मनोरंजनात्मक ,आशा सर्व ठिकाणी भेट दिल्यामुळे मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. सदर सहल यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन जोगदंड, नागापूर बुद्रुकचे मुख्याध्यापक युवराज साळुंके, प्राथमिक पदवीधर सुधीर कदम, ज्येष्ठ शिक्षिका छाया मेहत्रे, अलका गेठे, प्रतिमा छत्रबंद, प्रज्ञा उजगरे, सविता राऊत, अजित मुळूक, सखाराम साळुंके, मिरगे मॅडम यांनी परिश्रम घेतले. सदर सहलीसाठी माध्यमिक विभागाचे पुरंदरे, आगार विभागाचे सचिन होले नागापूर खुर्द प्राथमिक आरोग्य केंद्राचे महेश सोनवणे व वाहन चालक माधव वैष्णव यांचे सहकार्य मिळाले. सहल यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल नागापूर खुर्द व बुद्रुक च्या ग्राम स्थांनी वाहन चालकाचा विशेष सत्कार केला.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–४, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ३०/२०२५**

अर्जदार– मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आंबिलवडगांव. ता. जि.बीड
विरूध्द
गैरअर्जदार– महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
अर्जदारातर्फे वकिल– ॲड. एस.बी.खाडे, बीड
**मागणी– अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आबिलवडगांव, ता. जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा शिक्षण याची सख्खी आई असुन अज्ञानाची नामे आदित्य पि. प्रविण तांदळे, वय ०७ वर्षे, धंदा पालनकर्ती आहे. अज्ञानाचे नावे असलेले मौजे अंबिलवडगांव हाददीतील गट नं. ३३७ मधिल क्षेत्रफळ ०–८० हे. आर. अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल

आज दिनांक २०/ ०१ / २०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : २५/०२/२०२५**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
जिल्हा न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. शेळके
**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज १७९४/२०२४**
**राजाबाई भ्र. सुखदेव जाधव व इतर व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :– १. राजाबाई भ्र. सुखदेव जाधव, वय – ५४ वर्षे, धंदा–शेती रा. नाथापुर, ता. जि. बीड, २. विजय पि. सुखदेव जाधव, वय–३२ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर, ३. अजय पि. सुखदेव जाधव, वय–२९ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर, ४. परशुराम पि. सुखदेव जाधव, वय–१६ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. अ.पा. क आई अर्जदार क १, रा. सदर.
(अर्जदार हे भारतीय आहेत)
विरुध्द निरंक
**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **सुखदेव पि. आण्णा जाधव** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सुखदेव पि. आण्णा जाधव यांचा मृत्यु दिनांक २५.०१.२०२४ रोजी नाथापुर, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ ते ४ मयताचे मुले आहेत. हे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुखदेव पि. आण्णा जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३० जानेवारी २०२५.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. शेळके
**मा. एम. आर. बडाख ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १५७१/२०२४, सुभाष विरूध्द निरंक नि. ९ सी.**

अर्जदार– १) सुभाष रघुनाथ नरवडे, वय – ६५ वर्षे, धंदा – शेती, पत्ता – अंकुश नगर, महाकळा ता. अंबळ जि. जालना, २) शंकर रघुनाथ नरवडे, वय – ७७ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर ३) दिलीप रघुनाथ नरवडे, वय – ४६ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर
**मागणी– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत विमलबाई रघुनाथ नरवडे, रा. पिंपळनेर ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **विमलबाई रघुनाथ नरवडे, यांचा मृत्यु दि. ३०/१२/२०२० रोजी राहते पिंपळनेर ता. जि. बीड** येथे मृत्यु झाला असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदाराचे वडील रघुनाथ शंकर नरवडे दिनांक ०४/०५/२०२० रोजी मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयत यांना इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत.

मयत विमलबाई रघुनाथ नरवडे, यांचे निधन झाले आहे. मयताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत विमलबाई रघुनाथ नरवडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ नोंव्हेबर २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढीले तारीख दि. ११/१२/२०२४ आहे.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. माने साहेब सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०३८/२०२४,**
CNR No. MHBI0200019962024
**धनंजय पि. दत्तात्रय पवार व २ इतर वि. निरंक, (मार्फत – ॲड. वाय. आर. शेळके)**

अर्जदार – १. धनंजय पि. दत्तात्रय पवार, वय–५३ वर्ष, धंदा–शेती, रा. विद्यानगर, बीड ता. जि. बीड २. श्रीमती रूपाली भ्र. विनोद पवार, वय–४१ वर्ष, धंदा–घरकार, रा. कालिका नगर, नगर रोड बीड ता. जि. बीड, ३. कौस्तुभ पि. विनोद पवार, वय–२० वर्ष, धंदा–शिक्षण, रा. सदर
विरुध्द निरंक
**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत **राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार** यांचा मृत्यु दिनांक १७/०२/२०१८ रोजी जिल्हा रूग्णालय बीड ता.जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ हि मयताच्या मयत मुलाची पत्नी आहे. व अर्जदार क. ३ हा नातु आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत राजुबाई भ्र. दत्तात्रय पवार यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख २३/०८/२०२४,** आज दिनांक २० माहे जुलै २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# नवमतदार हे देशाचे भविष्य: जिल्हाधिकारी पाठक

## मतदार दिनानिमित्त निघाली रॅली





**बीड । प्रतिनिधी**

नवयुवक आणि नवमतदार येत्या काळात देशाचे भवितव्य आहेत त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले .राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रॅलीला हिरवी झेंडी दाखवून त्यांनी सुरुवात केली याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेश सुर्यवंशी , जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके ,नायब तहसीलदार सुरेंद्र डोके इतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की, देश हा महासत्ता बनू पाहतोय राष्ट्रीय मतदार दिनाच्या जनजागृतीत नवयुवकांचा असलेला सहभाग पुढील निवडणूकीत बीडचे चित्र पालटून दाखवेल.आज चंपावती विद्यालयामध्ये मतदान दिनानिमित्त मतदान जनजागृती विषयाशी संबंधित रांगोळी स्पर्धा घेण्यात आली . या स्पर्धेत २५ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता . या प्रदर्शनास तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी भेट दिली.

रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणातून सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथुन समाज कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला . रॅलीच्या समारोप प्रसंगी चंपावती विद्यालयाची विद्यार्थीनी नम्रता तांबे म्हणाली की बीड जिल्हा हा आता केवळ उसतोड कामगारांचा जिल्हा राहिलेला नसून या जिल्हयाने उत्कृष्ट खेळाडू , उत्तम प्रकारचे अधिकारी निर्माण करुन बीड जिल्हयाला ख-या अर्थाने पुढे नेले असून आपली बीडकर अशी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दृष्टीकोण बदलला पाहिजे असे तीने आपल्या मनोगतात व्यक्त केले . उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सन्मानचिन्ह देऊन नम्रता तांबे हिचा गौरव केला . राष्ट्रीय मतदार दिनाच्या रॅलीत विविध शाळेने उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले. बीड तालुक्यात विविध ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिनाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी शपथ घेतली काही ठिकाणी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. लोकशाही अधिकाधिक बळकट करण्याच्या दृष्टिकोनातून निवडणुकांना जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावणे या गोष्टीस आहे . त्यामुळे १८ वर्षावरील युवकांनी आपापली नावे मतदार यादीत नोंदवावी आणि लोकशाहीत सक्रिय सहभाग नोंदवावा असे यानिमित्ताने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केले आहे .

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा





**बीड । प्रतिनिधी**

बाबूजी आवड महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिन आज उत्साहात साजरा करण्यात आला. श्री. दिग्विजय पाटील, (नायब तहसीलदार, तहसील पाथर्डी ) हे प्रमुख पाहुणे तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदान दिन कार्यक्रम संपन्न झाला. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जागरूक मतदार आवश्यक असतो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमार्फत दिलेला हा मतदानाचा हक्क लोकशाहीच्या बळकटीसाठी किती आवश्यक आहे याचे महत्त्व दिग्विजय पाटील यांनी आपल्या मनोगत मध्ये व्यक्त केले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान फॉर्म लवकरात लवकर भरून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी करिता निष्पक्षपणे मतदान करण्याचे आव्हान केले याप्रसंगी दिग्विजय पाटील यांनी मतदारांना शपथ दिली. तसेच राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अरुण राख राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तर आभार डॉ. अशोक डोळस यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. डी. डी. पालवे डॉ अशोक कानडे डॉ. प्रशांत साळवे डॉ. भगवान सांगळे डॉ. अभिमन्यू ढोरमारे ग्रंथपाल डॉ. प्रो. किरण गुलदगड प्रा. शरद बोडके प्रा. विजयकुमार मस्के इत्यादी उपस्थित होते.

## निर्भीड पत्रकार संघाच्या महिला पदाधिकारी कार्यकारणी जाहीर!

### जिल्हाध्यक्षपदी किरण डोळस उपाध्यक्षपदी मोनिका बेद्रे सचिव आम्रपाली साबळे यांची निवड




**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पत्रकार संघ बीड जिल्हा सामाजिक विंग च्या महिला पदाधिकाऱ्यांच्या निवड जाहीर करण्यात आल्या आहेत. संस्थापक अध्यक्ष रुचिता रमण मलबारी यांच्या आदेशाने तथा जिल्हाध्यक्ष देवेंद्र सिंह ढाका यांच्या नेतृत्वाखाली या निवड जाहीर करण्यात आले असून महिला जिल्हाध्यक्षपदी किरण डोळस उपाध्यक्षपदी मोनिका बेद्रे तर जिल्हा सचिव म्हणून आम्रपाली साबळे यांची निवड करण्यात आली आहे. सर्व पदाधिकाऱ्यांना संघाचे सल्लागार जेष्ठ पत्रकार अनिल ससाने यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक संपादक समीर काझी तथा जिल्हा सचिव आनंद वीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य, पत्रकारिता सोबत विविध सामाजिक क्षेत्रात ही अग्रेसर आहे .निर्भीड पत्रकार संघाच्या विविध विंग सध्या कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात काम करत असलेल्या महिलांना काम करण्याची संधी देत निर्भीड पत्रकार संघ सामाजिक दायित्व निभावत आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रदीप अंबारे राज्यात प्रथम

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या फूड सेफ्टी ऑफिसर पदाच्या परीक्षेचा निकाला नुकताच जाहीर झाला असून यामध्ये प्रदीप वसंत अंबारे हा विद्यार्थी राज्यात प्रथम आल्याने पुन्हा एकदा आदित्य शिक्षण संस्थेचा अटकेपार झेंडा फडकल्याने प्रदीपचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनदंन केले. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशिवाय स्पर्धा परिक्षा, विविध क्रीडा स्पर्धा, करिअर विषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या फूड सेफ्टी ऑफिसर पदाची परिक्षा आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रवीण अंबारे याने परिक्षा दिली होती. प्रवीण अंबारे हा आदित्य शिक्षण संस्थेत २०१४ ते २०१७ या कालावधीत शिक्षण घेत होता. प्रदीप वसंत अंबारे हा आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा पदवीधर आहे. अभ्यासूवृत्ती व मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश खेचून आणले आहे.

### आदित्य शिक्षण संस्थेत मिळालेल्या मार्गदर्शना मुळे अधिकारी झालो



**आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असतांना येथे केवळ पदवीचेच शिक्षण मिळाले नाही तर आयुष्याची शिदोरी मिळाली. मला अधिकारी होण्याची प्रेरणा या महाविद्यालयातून मिळाली. याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी गोंदियाचे कृषी अधीक्षक निलेश कानवडे, वनरक्षक हरीलाल सरवदे, दिपक दहिवळे अशा अधिकाऱ्यांकडून प्रेरणा तर डॉ. आदित्य सारडा साहेब, डॉ. अदिती सारडा मॅडम आणि महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल सानप सर, प्राचार्य शाम भुतडा सर, प्राचार्य सतीश कचरे सर यांचे मार्गदर्शन मिळाल्याने मी हे यश प्राप्त करू शकलो. –प्रदीप अंबारे**

### प्रदीप अंबारे महाविद्यालयाचा गोल्ड मेडल विद्यार्थी

**प्रदीप अंबारे हा विद्यार्थी आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा पदवीधर आहे. अभ्यासूवृत्ती व मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश खेचून आणले. महाविद्यालयात तो गोल्ड मेडल प्राप्त आहे. त्याचे यश इतरांसाठी प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत घेतली तर यश नक्कीच मिळते हे प्रदीप अंबारे याने दाखवून दिले आहे.– प्राचार्य अमोल सानप, आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान माहाविद्याल, बीड**

## परिच्या स्वप्नाची बीडकरांना भुरळ!

### आर्ट ऑफ फन अकॅडमी गेवराईच्या संस्कृतीक चळवळीसाठी संजीवनी!



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१ वी राज्य बालनाट्य स्पर्धा सुरु झाली असून या स्पर्धेत गेवराईच्या आर्ट ऑफ फन अकॅडमीमधील विद्यार्थ्यांनी कलावंत रोहित पुराणिक लिखित आणि दिग्दर्शीत परीचे स्वप्न हे नाटक सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये विशेष बाब म्हणजे सहभागी बाल कलाकारांनी आजवर कधीही नाटकात काम केलेले नाही तरीही परीचे स्वप्न हे नाटक सादर करून रसिक श्रोत्यांची शाबासकी मिळवली. कलाकारांची खान म्हणून गेवराई तालुका ओळखल्या जातो. मात्र मागील काही वर्षांपासून गेवराईमध्ये सांस्कृतिक चळवळ थंडावलेली असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत गेवराईच्या आर्ट ऑफ फन अकॅडमीने पुढाकार घेत हौशी बाल कलाकारांना एकत्रित करून राज्य बालनाट्य स्पर्धेत परीचे स्वप्न हे नाटक सादर केले. अनेक वर्षांनी गेवराई तालुक्यातून राज्य बाल नाट्य स्पर्धेत गेवराईचा संघ आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या माध्यमातून सहभागी झाल्याने गेवराईची नाट्य संस्कृती पुनर्जीवीत झाल्याचे भासले. परिचे स्वप्न या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन कलावंत रोहित पुराणिक यांनी केले तर नेपथ्य– दिपक गिरी, शिवकुमार सोनवणे, संगीत– सत्यजित पवार, प्रकाशयोजना– रोहित पुराणिक, रंगमंच व्यवस्था– विवेक शर्मा, श्लोक मानधने, रंगभूषा आणि वेशभूषा– सौ. मनीषा मानधने यांनी केले. या नाटकात सहभागी बाल कलाकार परी– ज्ञानदा जोशी, आजोबा– युवराज घाडगे, चंद्र – राधिका मोटे, मोठी बहिण– काव्या मुंदडा, भाऊ– आयुष कांडेकर, मैत्रीण– आर्या वावरे, मंन्नथ वादवाणी हे होते.

## मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा : बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांचे आवाहन




**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी सदरील कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार असून या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे.

## बिंदुसरा नदीपात्रात जनतेच्या पैशातून लाखों रुपये खर्चून बांधलेला वॉकिंग ट्रॅक पुढारी पोसण्यासाठी की बांधकाम अतिक्रमणासाठी ?

### नगरपालिकेच्या आशिर्वादाने बिंदुसरा नदीचा ओढा झाला : डॉ.गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या बाजूने नागरिकांसाठी जनतेच्या पैशातून लाखो रुपये खर्चून वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आलेला आहे.परंतु सद्यस्थितीत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्याने रस्त्याचा वापर करण्यात येत नाही त्यामुळे हा नगरीकांसाठी कि पुढारी यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी की भुमाफियांना अतिक्रमित बांधकाम करता यावे यासाठी आहे ?असा सवाल सामाजिक कार्यकर्यांनी नगरपरिषद प्रशासनाला विचारला असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना केली आहे.

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या बाजूने नागरिकांसाठी लाखों रुपये खर्चून वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आला होता. परंतु सद्यस्थितीत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यात येत असल्याने या रस्त्याचा वापरच करण्यात येत नाही या ठिकाणी कचऱ्यांचे मोठमोठे ढीग साचल्याने हा रस्ता संपूर्णपणे कचऱ्याने व्यापलेला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील मोंढा रोड लगत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना चालण्यासाठी बिंदुसरा नदीच्या कडेने नगरपालिकेने १० फुटी रस्ता तयार केला आहे. यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. नागरिकांना सकाळी मॉर्निंग वॉक करता यावा तसेच मोंढा रोड ते सुभाष रोड पर्यंत चालत जाता यावे यासाठी बिंदुसरा नदीच्या पात्राशेजारी हा ट्रॅक तयार करण्यात आला. परंतु नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे सद्यस्थितीमध्ये हा रस्ता कचऱ्याने व्यापलेला आहे बाजूच्या शेतातील पाणी येऊन सगळीकडे चिखल या रस्त्यावर झालेला आहे .

बीड शहरातील कचरा व्यवस्थापन सुरळीत राहावे यासाठी नगरपालिके कडून नाळवंडी रोड भागात मोठमोठ्या खदानी तयार करण्यात आलेल्या आहेत. परंतु पालिकेच्या गाड्या ज्या शहरातील कचरा गोळा करतात त्यांच्याकडून नदी पात्रताच कचरा टाकण्यात येत असल्याचे वारंवार समोर आलेले आहे .परिणामी प्रचंड दुर्गंधी आणि घाण या रस्त्यावर कायम असते. त्यामुळे नागरिकांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या या रस्त्यासाठी खर्च करण्यात आलेल्या लाखो रुपये कचऱ्यातच गेले असल्याचे चित्र आहे.

## श्री नारायण विद्यालयामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन केले.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अध्यात्माचे माहेर घर म्हणून ओळखलं जाणार श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गेल्या ७३ वर्षापासून धर्मनाथ बीजेचे आयोजन केलं जाते. श्री.ह.भ.प.वै.सद्गुरु किसनबाबा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने या वर्षी धर्मनाथ बीजेच्या ७४ व्या वर्षा निमित्त ह.भ.प.शांतीब्रह्म गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहास दि. २४ जानेवारी पासून सुरुवात झाली असून या सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. ३१ जानेवरी रोजी होणार आहे. सप्ताह दरम्यान महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक यांचे सादरीकरणासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोषीसह जिल्ह्यातील भाविक–भक्तांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

